# अक्षरवेल

कविता

म. ग्रं. सं. ठाणें
विषय काव्य
सं. नं. ९३८८
९८५८

सदानंद रेगे

प्रस्तावना : प्रा. वा. ल. कुळकर्णी

REFBK-0009424
REFBK-0009424

पॉ प्यु ल र बु क डे पो, मुं ब ई ७

मूल्य तीन रुपये

# अक्षरवेल



सदानंद रेगे

# अक्षरवेल

मराठा ग्रंथ संग्रहालय, ठाणे.
अनुक्रम २१८४७ वि: ........
क्रमांक १३८८८ नों: दि. ५/६/५८

सदानंद रेगे यांचे कथासंग्रह

जीवनाचीं वस्त्रें

काळोखाचीं पिसें

# अक्षरवेल

कविता

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थलप्रत
अनुक्रम ... वि:
क्रमांक ... नों: दि:

**सदानंद रेगे**

**प्रस्तावना : प्रा. वा. ल. कुळकर्णी**

REFBK-0009424
REFBK-0009424

पॉ प्यु ल र बु क डे पो, मुं ब ई ७

मूल्य तीन रुपये

पॉप्युलर प्रकाशन : १८ :
प्रथमावृत्ति
वैशाख १८७९
(मे १९५७)

मुद्रक :
वि. पु. भागवत
मौज प्रिंटिंग ब्यूरो
खटाववाडी, मुंबई ४

प्रकाशक :
ग. रा. भटकळ
पॉप्युलर बुक डेपो
लॅमिंग्टन रोड, मुंबई ७

# अनुक्रम


| | | | |
|---|---|---|---|
| अक्षरवेल | १ | चेटूक | ३४ |
| सोनफुलोरा | ३ | घार | ३६ |
| गंज | ४ | नागीण | ३७ |
| लाट | ५ | चांदणी | ३९ |
| निळ्या टेकड्या | ६ | वीज | ४१ |
| दोन पारवे | ७ | कळीं | ४२ |
| फिनिक्स | ८ | पक्षी उन्हाचा | ४३ |
| श्रावण | ९ | टिंबें | ४४ |
| भुकेच्या पिराशीं | १० | दुपार | ४५ |
| सोहळा | ११ | चांदणें | ४६ |
| वसंतागमीं | १२ | जास्वंदीचें फूल | ४७ |
| फूल मनाचें | १३ | रानकबूतर | ४९ |
| चांद | १४ | ज्यूडास | ५० |
| कोंकरूं | १५ | माझा अश्वत्थ | ५१ |
| प्राक्तन | १६ | आली वसंताची लाट | ५३ |
| गॉलगोथा | १७ | फुंकर | ५४ |
| साद | १८ | चंद्रकोर | ५५ |
| ती अशीच होती सकाळ... | २० | माझ्या हातांतील माती म्हणते आहे... | ५६ |
| हळद उन्हाची... | २३ | स्वप्नाचा ठिपका | ५८ |
| ऋषी | २४ | चंदन | ५९ |
| पानझड | २६ | माती | ६० |
| आतांच कुठेंशी... | २७ | आकाशाची जखम | ६१ |
| भुऱ्या दाढीचा जादूगार | ३० | वेदनांचें कथ्थक | ६४ |
| पांखरें थेंबांचीं | ३१ | सवत | ६५ |
| पाऊसपक्षी | ३२ | उंदीर | ६६ |
| शेवगा | ३३ | | |

| | | | |
|---|---|---|---|
| भूत | ६८ | जखमी स्वप्न | ८५ |
| मी वादळ होऊन येत्यें… | ६९ | मुखवटा | ८६ |
| भास | ७० | फूल | ८७ |
| ज्वाला | ७१ | पान | ८८ |
| रातकिडा | ७२ | तप | ९० |
| वारा भणाणा वहात होता… | ७३ | मीरा | ९१ |
| दोन आत्मचरित्रें | ७४ | उध्वस्त | ९२ |
| ७ नोव्हेंबर १९०५ | ७५ | शेला | ९४ |
| उडाला तर कावळा… | ७६ | चैत्रव्रत | ९५ |
| हाडांची दरी | ७७ | ओहोटी | ९६ |

★

**खालील मुद्रणदोष पुढें दर्शविल्याप्रमाणें सुधारून घ्यावेत**

| पृष्ठ | ओळ | अशुद्ध | शुद्ध |
|---|---|---|---|
| ९ | ४ | ओंजळिमधून | ओंजळीमधून |
| ३२ | ११ | डौलानं | डौलानें |
| ६६ | २३ | कें‌वळ | केवळ |
| ६८ | ६ | त्याक्षणीं | त्या क्षणीं |
| ६९ | ५ | पावलाच्या | पावलांच्या |
| ७० | ९ | चांदण्यांच्या | चांदण्याच्या |

श्री मंगेश पाडगांवकर
ह्यांस—

*Go, my songs, seek your praise from the young*
*and from the intolerant,*
*Move among the lovers of perfection alone.*
*Seek ever to stand in the hard Sophoclean light*
*And take your wounds from it gladly.*

*Ezra Pound*

# सदानंद रेग्यांची ‘ अक्षरवेल ’

मर्ढेकरांच्या मतें अर्वाचीन काळांत एकच नवीन कवि होऊन गेला व तो म्हणजे बालकवि. मर्ढेकरांच्या ह्या विधानांत कितीहि तथ्यांश असो वा नसो, एवढें खरें कीं बालकवींच्या पूर्वी मराठी कवितेंत निसर्ग अवतरत होता तो बहुधा साधनरूपानें, अलंकरणाच्या रूपानें. तो क्वचित्‌च सजीव झाला. तो प्रथम बोलूं लागला, हंसला, रडला, बागडला, तो बालकवींच्या कवितेंत. त्याचे भाव, विभ्रम, रंग, त्याचीं रूपें, तो घेत असलेले विविध आकार, त्याचे moods यांना प्रथम वाचा फुटली ती बालकवींच्या कवितेंत. तेथें अरुण बोलका झाला, संध्यारजनी प्रेमदेवता बनली, चंद्रकला राणी मंदपणें हंसूं लागली, संध्यातारक ‘ कोमल किरणीं नभ फुलवोनी ’ खेळ खेळूं लागला, तारका लाजूं लागल्या, निर्झर बागडूं लागला, अनामिक ‘ बालविहग आनंद मूर्तिमान्‌ ’ गगनांत झुलूं लागला, डोळ्यादेखत साध्याभोळ्या फुलराणीचें रूपांतर मीलनोत्सुक फुलराणींत झालें—निसर्गाची केवढी तरी विविधरंगी विविधढंगी सृष्टि बालकवींच्या कवितेंत एकदम सजीव झाली, फुलून आली. हा चमत्कार मराठी कवितेंत बालकवींनंतर क्वचित्‌च जाणवला.

बालकवींच्या मृत्यूनंतर आज किती तरी वर्षांनीं मराठी रसिकांना खरीखुरी निसर्गकविता परत वाचायला मिळूं लागली आहे. १९४० च्या पूर्वींच तिची पहिली चाहूल बा. भ. बोरकर, इंदिरा संत, पु. शि. रेगे, ना. घ. देशपांडे यांच्या कवितेंतून आपल्याला ऐकूं येऊं लागली. गेल्या दहा पंधरा वर्षांत तिचें रूप अधिकाधिक स्पष्टपणें गोचर झालें; (आतां तर तें इतकें स्पष्टपणें गोचर झालें आहे कीं त्यांतून जन्मास येऊं लागलेली सांकेतिकताहि आपणांस पदोपदीं बोंचूं लागली आहे.) आणि हें जसजसें स्पष्ट होऊं लागलें, तसतसा तिचा आगळेपणाहि जाणवूं लागला. आपण ह्या कवितेला निसर्गकविता ह्या नांवानेंच आज संबोधित असलों—खरें म्हणजे आपल्याला आतां ह्या नामाभिधानांचें वैयर्थ्य जाणवलें आहे व त्यांचा कंटाळाहि आला आहे—तरी बालकवींची निसर्ग-

कविता आणि ही आजची पाडगांवकर, सदानंद रेगे ह्यांची निसर्गकविता ह्यांत थोडा फरक आहे. हा फरक, मला वाटतें, नुसता व्यक्तिगत नसून तो कालमानानें अपरिहार्यपणें पडलेला फरक आहे. हा फरक कोणत्या प्रकारचा आहे हें पाहणें उद्बोधक आहे. बालकवींच्या कवितेंत, नाहीं म्हटलें तरी, थोडा वर्णनात्मक भाग आहे व कथनात्मक भाग आहे. बालकवि कथेचा आपल्या कवितेसाठीं खूपच उपयोग करून घेतात. त्यांच्या 'संध्यारजनी', 'फुलराणी' ह्यासारख्या आपल्या आवडीच्या कवितांना-देखील लक्ष्यांत घेण्याजोगें कथासूत्र आहे. ह्या कथासूत्रांच्या भोंवतींच त्या उमललेल्या आहेत. बालकवींच्या कवितेंत खडकावर आदळून फुटलेल्या लाटेच्या तुषारांप्रमाणें उधळलेल्या खऱ्याखुऱ्या उत्प्रेक्षांना— उत्प्रेक्षांच्या झुंडींना फार महत्त्व आहे. ह्या उत्प्रेक्षांमधून अनेक वेळां त्यांची उत्फुल्ल भाववृत्ति व्यक्त झाली आहे. बालकवींच्या बऱ्याच कविता ह्या उद्देशिका आहेत. कोणाला तरी पाहून किंवा कोणाला तरी उद्देशून केलेल्या चिंतनांतून त्या जन्मलेल्या आहेत. 'निर्झरास', 'संध्यातारक', 'पांखरास', 'बालविहग' यासारख्या त्यांच्या अनेक कविता वाचतांना हें जाणवल्याखेरीज राहत नाहीं. (बालकवींनंतर रविकिरणमंडळाच्या काळांत ह्या उद्देशिकांमध्यें घुसलेला बेगडीपणा आपणा सर्वांना मध्यंतरीं चांगलाच जाणवला आहे.) बालकवींच्या निसर्गकवितेचीं हीं जीं अगदीं सहजपणें लक्षांत येणारीं कांहीं वैशिष्ट्यें सांगितलीं तीं आजच्या निसर्गकवितेंत फारशीं आढळत नाहींत. आजच्या उत्तम निसर्गकवितेंत केवळ वर्णनाला वा निवेदनाला आतां फारसें स्थान उरलेलें नाहीं. एखाद्या क्षीण कां होईना कथासूत्राचा ती क्वचितच आधार घेतांना दिसते. तिचें स्वरूप उद्देशिकेप्रमाणें क्वचितच असतें. बालकवींच्या कवितेंतील उपमा-उत्प्रेक्षांप्रमाणें तिच्यामध्यें बहुधा उपमा-उत्प्रेक्षांचें अवतरण होत नाहीं. तिची प्रतिमासृष्टि थोडी वेगळ्या प्रकारें साकार होते. तिचें स्वरूप अनुभवनिवेदनापेक्षां अनुभवशोधनात्मक व अनुभव-दर्शनात्मकच अधिक दिसतें. बालकवींची कविताहि विविध भाववृत्तींची डूब घेऊन अवतरलेली आहे; नाहीं असें नाहीं; परंतु आजच्या चांगल्या निसर्ग-कवितेंत निसर्गदर्शनापेक्षां मनोदर्शनालाच अधिक महत्त्वाचें स्थान

प्राप्त झालें असल्याचें दिसतें. तिच्यामधून मुख्यत्वेंकरून डोळ्यांत भरतें तें मनोदर्शन, निरनिराळ्या अनामिक भाववृत्तींचें (moods) दर्शन व त्या भाववृत्तींना सूचित करणारें निसर्गदर्शन. ह्या दर्शनांत एक प्रकारची तरलता असते; अल्पाक्षरत्व असतें; संमिश्र अनुभूति अत्यल्प परंतु नेमक्या चित्रमयी शब्दांत शब्दांकित करण्याची धडपड असते. जणूं शब्दांच्या ठिकाणीं असलेल्या अनुभव प्रकट करण्याच्या सर्व स्फुट-अस्फुट शक्ति कामीं लावल्या जात असतात. स्थूलापेक्षां सूक्ष्मावरच लक्ष अधिक केंद्रित केलेलें दिसतें. विविध संवेदनांची एकदम एकाच वेळीं अनुभूति घडविण्याची शक्ति असते. असल्या प्रकारच्या आजच्या कवितेचा प्रत्येक चरण—नव्हे त्या चरणांतील प्रत्येक शब्द—प्रतिमासंपन्न असतो; प्रतिमांची एक अनेक पैलूंनीं चमकणारी सृष्टि तो आपल्या आगमनानें जणूं साकार करीत असतो; ही सृष्टि चमकूं लागली कीं एकाच वेळीं रंग, आकार, गंध स्पर्श, भाव व गति ह्यांची एकसमयावच्छेदेंकरून जाणीव निर्माण करणारी अनुभूति आपणांस येऊं लागते. ह्या अनेक परिमाणात्मक अनुभूतीचें स्वरूप लक्षांत घेतलें कीं बालकवींच्या कवितेनंतर मराठी कवितेनें केलेला हा प्रवास आपल्या लक्षांत आल्यावाचून राहत नाहीं.

मला सदानंद रेगे यांची वरील अर्थाची निसर्ग-कविता आवडते. तिच्यांत एक प्रकारचा आगळेपणा आहे. रेग्यांचे विविध भाव निसर्ग टिपून घेतो व निसर्गाचे विविध भाव जणूं रेगे टिपून घेतात. रेग्यांचीं निसर्गचित्रें फार बोलकीं आहेत. तीं रेखीव आहेत, तरल आहेत, तशींच भावार्त आहेत. रेग्यांना वसंताप्रमाणें—नव्हे, वसंतापेक्षांहि—आषाढ-श्रावणाचें विशेष आकर्षण आहे. आभाळ ढगाळलें, कृष्ण घनांतून 'गर्भरेशमी वीज' निखळूं लागली, आषाढ-सरी कोसळूं लागल्या, पागोळ्या गळूं लागल्या, रस्त्यारस्त्यावर पाणी सांचलें, त्यांत रस्त्यावरील दिव्यांचीं प्रकाशटिंबें तरळूं लागलीं, तारायंत्राच्या तारांवर पाण्याचे थेंब लोंबकळूं लागले कीं, रेग्यांच्या आर्त भाववृत्तींना जणूं साद मिळते व त्यांची प्रतिभा बोलकी होते. (रेग्यांच्या लघुकथांमधून अमावास्या, अंधार, मृत्यु ह्यांना मिळालेलें महत्त्व व त्यांच्या कवितांमधून वर्षाकालांतील ढगाळलेल्या सृष्टीला प्राप्त झालेलें स्थान ह्यांचा जवळचा कांहीं भावसंबंध असावा असें



मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें. स्थळप्रत.
वि: ८०५

येथें मधूनच मनांत येतें.) मग कितीतरी नाजुक रेखाचित्रें जन्माला येतात. परंतु हीं रेखाचित्रें केवळ अर्थपूर्ण तपशीलाच्या कलात्म जुळणींतून जन्माला आलेलीं नसतात; तीं ज्या अनुभूतींतून जन्माला येतात, त्या अनुभूतीनें अगदीं स्वाभाविकच एका प्रतिमासृष्टीला जन्म दिलेला असतो व म्हणूनच तीं चित्रें म्हणजे ह्या प्रतिमासृष्टीचें अवतरण असतें :

**पाउसपक्षी**
**कृष्णसांवळा**
**शाळिग्रामसा**
**श्यामलसुंदर**
**क्षितिजाच्या**
**थरथर तारेवर**
**बसुन पालवित**
**पंख ढगांचे**
**गोंजारित अन्**
**पिसें विजेचीं**
**वादळ चोंचीनें...डोळानें**
**मृद्गंधाला**
**घेउन वक्षीं**
**...पाउसपक्षी !**

येथें प्रतिमासृष्टि व ती प्रतिमासृष्टि ज्या अनुभूतीनें निर्माण केली ती अनुभूति ह्यांत एक प्रकारचें अभिन्नत्व असतें. त्यांचा परस्पराशीं असणारा संबंध साध्यसाधनाचा नसतो; तर ती प्रतिमासृष्टि म्हणजेच जणूं अनुभूति असें वाटतें.

वर उद्धृत केलेल्या छोट्या कवितेंत—आणि रेगे यांच्या उत्तम निसर्गकविता ह्या छोट्याच आहेत; एखाद्या पट्टीच्या गवयानें अगदीं सहजपणें मारलेल्या लकेरीसारखें त्यांचें रूप आहे—'पाउसपक्षी' ही प्रतिमा आहे. ही पक्ष्याची प्रतिमा रेगे यांच्या कवितेंत वरचेवर अवतरतांना दिसते. 'पक्षी उन्हाचा', 'पांखरें थेंबांचीं', 'सावल्यांच्या चिमण्या',

'दीपगृहांतील फूलपांखरूं', 'आषाढचिमणी' ह्या त्यांपैकीं कांहीं प्रतिमा; आणि ह्या प्रतिमा अगदीं सहजपणें येतात. 'उन्हाचा पक्षी' असें किती वेळां म्हटलें तरी जी प्रतिमा आपल्या डोळ्यापुढें येणें जवळ जवळ अशक्य तीच पुढील चित्रांत किती अपरिहार्य व अर्थपूर्ण वाटते पाहा :

**तृप्त मनाच्या**
**गर्भरेशमी**
**श्रावणधारा**
**पहापहातां**
**येती...**
**जाती...**
**मांडुन गोंडस**
**कांच-तळ्यांचा**
**लख्ख पसारा...**

**आणि ढगाच्या**
**घरट्यामधला**
**पक्षि उन्हाचा**
**उतरुन खालीं**
**फुलपायांनीं**
**संथ डुंबतो**
**त्यांत**
**फुलवुनी**
**किरणपिसारा !**

प्रतिमा हीच अनुभूतिरूप घेते ती अशी. जी गोष्ट 'पक्षी उन्हाचा' ह्या प्रतिमेची तीच ह्या इतर प्रतिमांची. त्यांच्यामध्यें एकएक सूक्ष्मतरल संवेदनात्मक अनुभूति जिवंत करण्याचें केवढें तरी सामर्थ्य असतें. हें संवेदनात्मक अनुभूतीमधील पुसटतें सौंदर्य रेगे किती नाजूकपणें टिपून घेतात हें अगदीं सहजपणें त्यांच्या कवितांतून वेचलेल्या पुढील तुकड्यांवरून लक्षांत यावें. हें दुपारचें एक क्षणचित्र :

मान टाकुनी
मातीवरती
रेघ पहुडली
चाकोरीची
आणि उन्हाची
पिवळी धम्मक
मंथर नागिण
कात टाकिते
या छायांची ...

हें श्रावणांतील एक दृश्य : (पहिल्या व तिसऱ्या कडव्यांतील पक्ष्याची प्रतिमा परत लक्षांत यावी.)

पानें झाडीतात
पागोळ्यांची लव
फुलांच्या कोषांत
ओलेतें मार्दव

वाऱ्याच्या चालींत
हिरवी चाहूल
अंगणीं वाजतें
थेंबाचें पाऊल

पिसें फुलारतें
उन्हाचें लेंकरूं
लाडें हंबरतें
छायेचें वांसरूं

उन्हाच्या कवडशांचीं रेगे ह्यांनीं अगदीं सहजगत्या रेखाटलेलीं चित्रें तर फारच हृद्य आहेत. हें चैत्रांतलें दृश्य पहा :

सोनफुलोरा नव्या उन्हाचा
त्यांत फुलांचा फेर बिलोरी

**पिवळे पिवळे धुंद कवडसे**
**वडाखालिं खेळती लगोरी.**

रेग्यांच्या ह्या निसर्गकवितांचा विचार करूं लागलें कीं किती तरी प्रतिमांची रांगच रांग आपल्या डोळ्यापुढून सरकूं लागते : लिंबाखालीं चिंब होऊन बसलेली सांवली, आकाशाच्या डोल्काठीवर बसलेलें चांदणीचें पोर, पाण्याच्या पाठीवर झुकलेल्या चांदण्याच्या वेण्या, चांदण्यांत पानांच्या मुदु कुशींत निजलेला छायांच्या स्वप्नांचा झुबका, घाटावरतीं शुभ्र धुण्यांच्या मंद झुलणाऱ्या पाकोळ्या, निवडुंगाच्या फडांत चिवचिवणाऱ्या सांवल्यांच्या चिमण्या, उगाच लाजणारी मेघमिठींतील फिकट चांदणी, अंधाराच्या खांद्यावर लवलेली नक्षत्रांची फांदी...एक ना दोन, अशा अनेक प्रतिमा डोळ्यांपुढें तरळूं लागतात; त्यांची निर्मिति ही खरोखरच नवनिर्मिति आहे व त्यांचें चित्रण त्यांच्या नाजुकपणाला ढका लागणार नाहीं इतक्या हलक्या हातानें झालें आहे. त्यामुळें रेगे ह्यांच्या कवितेंतून व्यक्त होणारे निसर्गाचे विविध विभ्रम आंधळ्यालाहि डोळस करतील इतके रेखीवपणें व्यक्त झालेले आहेत.

रेगे यांच्या वृत्तींत एक प्रकारचा विक्षिप्तपणा आहे. हा विक्षिप्तपणा त्यांच्या कथांप्रमाणें त्यांच्या कवितांमधूनहि दिसून येतो. तो जसा त्यांच्या कवितेंतून व्यक्त होऊं पाहणाऱ्या अनुभवांमध्यें गोचर होतो तसाच ते अनुभव ज्या प्रतिभांच्या द्वारां व्यक्त होऊं पाहत असतात त्या प्रतिमांमध्येंहि दिसून येतो. परंतु हा विक्षिप्तपणा विशेषच विक्षिप्त वाटण्याचें कारण असें कीं, ह्याला खेटूनच त्यांच्या कवितेंत एक विलक्षण सरलत्वहि आहे. हें सरलत्व त्यांच्या 'कोंकरूं', 'ऋषी', 'सोनफुलोरा', 'नागीण' ह्यासारख्या अनन्यसाधारण परंतु आकलनीय अनुभूतीचें प्रकटीकरण करूं पाहणाऱ्या कवितांमधून जाणवतें. सरलत्व व विक्षिप्तपणा ह्यांचें रेगे यांच्या कवितेंतील हें मिश्रण फार गमतीदार झालें आहे. त्यांच्या कवितांतून व्यक्त होऊं पाहणाऱ्या कांहीं अनुभूतींचें स्वरूप असें आहे कीं त्यांची ओळख पटते व पटत नाहींहि. त्यांत एक विचित्र कलंदरपणा दिसून येतो. स्वतःतच मशगूल होण्याची, एखाद्या लहरी

भाववृत्तींतून येणाऱ्या अनुभवाचा तळ गांठण्याची प्रवृत्ति दिसून येते. त्यांच्या अनेक कवितांमधून स्वप्नाला व स्वप्नानुभवाशीं संबद्ध असणाऱ्या प्रतिमांना जें महत्त्व येतें तें ह्यामुळेंच. ह्या संग्रहाच्या उत्तरार्धांतील अनेक कवितांमधून हें जाणवेल. रेगे ह्यांच्या मनाची ही प्रवृत्ति ज्याप्रमाणें त्यांच्या 'अक्षरवेल' ह्या स्वतःच्या काव्यावर प्रकाश टाकणाऱ्या कवितेंतील

**तिच्या सांवळया छायेंत**
**घुमे स्वप्नांचा पिंगाणा,**
**तिच्या किमयेनें काळया**
**होई अनंग दिवाणा.**

ह्या आत्मकथनपर पंक्तींत दिसून येते त्याचप्रमाणें तिचें खरें स्वरूप 'लाट' ह्या कवितेंत फारच स्पष्टपणें व्यक्त होतें. रेगे म्हणतात,

**क्षितिजावरून**
**माझीया मनाच्या**
**अकस्मात् येते**
**एक प्रचंड लाट**
**अन् क्षणार्धांत**
**घेते ती कवेंत**
**अंबराच्या झुंबरांना**

**...वाटतं,**
**असंच पडावं बाहेर**
**नि यावं फिरून**
**ब्रह्मांडाच्या नाक्यावरून!**

त्यांच्या कविता वाचूं लागल्यावर वाटतें कीं खरोखर अशा अनेक प्रचंड लाटा त्यांच्या मनाच्या क्षितिजावरून त्यांना न कळत येत असाव्यात आणि त्यांच्या मनाचा कानाकोपरा व्याप्त करून टाकीत असाव्यात व मग अशा लाटांबरोबर घरंगळत जाणारें त्यांचें मन खरोखरच अधूनमधून ब्रह्मांडाच्या नाक्यावरून फिरून येत असावें. 'निळया टेकड्या', 'जास्वंदीचें फूल', 'माझा अश्वत्थ', 'फुंकर', 'स्वप्नाचा ठिपका', 'ज्वाला', 'वारा भणाणा

वहात होता', 'जखमी स्वप्न', 'फूल', 'तप'...किती कवितांचीं नांवें लिहायचीं! ह्या सर्व कवितांत आपल्या मनाला थोड्याफार बेछूटपणें मोकळें सोडण्याची, त्याला त्याची स्वतःची अशी स्वैर लकेर छेडूं देण्याची, स्वतःचें अंतरंग अचानक धुंडाळूं देण्याची प्रवृत्ति दिसून येते. ह्या सर्वच आणि इतर अनेक कवितांतून ही 'ब्रह्मांडाच्या नाक्यावरून फिरून येण्याची' रेगे यांच्या मनाची वृत्ति कोठें ना कोठें तरी खास जाणवून जाते.

रेगे ह्यांच्या सदर कवितांची मौज अशी आहे कीं, त्यामधून व्यक्त होणाऱ्या विविध गडद वृत्तींचे (moods) रंग तर आपणांस स्पष्टपणें जाणवतात; परंतु त्यांतून व्यक्त होऊं पाहणाऱ्या अनुभवाला पुष्कळदां स्पष्ट आकार येत नाहीं. ह्याचें कारण असें असावें कीं आपणांस नेमका कोणता अनुभव येत आहे ह्याची रेगे यांनाच त्या लिहितांना नीटशी जाणीव नसावी. वृत्ति आर्त व उत्कट झालेल्या असतात, प्रतिमा तरळत असतात, अभिव्यक्तीची ऊर्मि अनिवार्य होते व म्हणूनच प्रतिमांमधून व्यक्त होते ती फक्त वृत्ति, नामांकित करितां येण्याजोगी अनुभूति नव्हे. वर ज्या कवितांचीं नांवें सांगितलीं त्यांतील अनेक कवितांमधून आपणांस हें जाणवल्याखेरीज राहत नाहीं. परंतु अनुभूति नामांकित होण्याजोगें रूप घेऊं शकत नाहीं म्हणून कवितेची काव्यात्मता कमी होते आहे असें नेहमींच वाटतें असें नव्हे. एवढेंच नव्हे तर ही मनाला चटका लावणारी कविता परत परत वाचावीशी वाटते. ज्या गमतीदार, क्वचित् विक्षिप्त पण रेखीव प्रतिमांमधून ती व्यक्त होत असते, त्या प्रतिमांवर रेंगाळावेंसें वाटतें, त्यांचें सौंदर्य लुटावेंसें वाटतें, जें गंवसल्यासारखें वाटत असतांनाच जाणिवेंतून एकसारखें निसटत असतें तें पुनःपुन्हां गंवसावेंसें वाटतें.—सारांश ज्याला काव्याचा आस्वाद असें आपण स्थूलार्थानें म्हणतों तो आस्वाद घ्यावासा वाटतो.

**धुवांधार अंधाराला फुटतात**
**घुबडाचे अंगारडोळे**
**आणि दिसूं लागतें**
**त्यांच्या बुबळांतून मला**

माझें मरणारें थडगें
माझ्याच वीर्यांत रुजलेल्या भीतीच्या
थंडगार पिंपळाखालीं गळून पडलेलें...
याच थडग्यांत बसून
कुरवाळीत असतों मी काळोखाचे सर्प
ज्यांनीं करावा
प्रकाशाचा डंख
म्हणून बसलों आहें मी केव्हांचा
या पिंपळाखालीं मांडी मोडून
जाणीवेच्या व्याघ्रांबरावर
कातरीत घुबडाचे पंख...

अशा प्रकारची रेगे यांची कविता जेव्हां आपण वाचतों तेव्हां तिच्यामधून व्यक्त होणाऱ्या वृत्तीची (mood) आर्तता व उत्कटता आपणांस जाणवल्यावाचून राहत नाहीं. त्या वृत्तीचें जग आपल्या डोळ्यापुढून खास तरळून जातें. परंतु त्याबरोबरच कोणता अनुभव तिजमधून साकार होत आहे असें विचारलें तर आपण काय उत्तर देऊं? हें उत्तर आपणांस नीटसें देतां येणार नाहीं.

रेगे ह्यांच्या कथेप्रमाणें त्यांच्या कवितेंतहि दुःखाला, जीव गुदमरून टाकणाऱ्या दुःखाला व विषण्णतेला फार महत्त्वाचें स्थान लाभलें आहे. जरी त्यांच्या 'सोनफुलोरा', 'हळद उन्हाची', 'श्रावण' ह्यांसारख्या कांहीं नितांत सुंदर निसर्गकवितांतून मनाची प्रसन्न व थोडीशी उत्फुल्ल वृत्ति व्यक्त झालेली असली तरी त्यांच्या बहुसंख्य कवितांमधून एक प्रकारच्या खोलवर दडलेल्या अबोल व थोड्याफार अबोध दुःखाचा सूरच एकसारखा ऐकूं येत आहे. त्यामुळें त्यांच्या काव्यांत आपल्या हृदयाची पकड घेणारी आर्तता अवतरली आहे. त्यांची प्रेमकविता ह्याच दुःखानें जडावलेली आहे. 'मत्प्रीतीच्या कबरीपाशीं', 'भास', 'वेदनांचें कथ्थक', 'मी वादळ होऊन येत्यें' ह्या आणि ह्यासारख्या इतर कवितांच्या बुडाशीं हें दुःखच आहे. असफलतेंतून जन्मास आलेलें दुःख आहे, spirit of resignation

आहे, मनाची आर्तता आहे. मला वाटतें, ह्या वृत्तीमुळेंच रेगे यांची प्रतिभा ढगाळ पावसाळी वातावरणांत बोलकी होत असावी व तिनें निर्माण केलेल्या प्रतिमासृष्टींत 'पुलाच्या कमानीखालून भरारूं लागलेल्या पाकोळीला', पागोळ्यांना, शेवाळाला, घुबडडोळ्यांना, थडग्यांना, कबरीला व तिजवरील हिरव्या शेल्याला, वेदनांच्या कथ्थकाला व मनाच्या जखमेला एवढें महत्त्व येत असावें. रेगे यांच्या ख्रिस्तचरिताशीं सलग्न असणाऱ्या कवितांची (व कथेची) जातकुळी हीच आहे. तेथेंहि रेगे यांचें मन दुःखालाच जणूं साद देतें आहे. तीं दुःखाचींच गाणीं आहेत. तीं रचतांना, गातांना रेगे यांच्या भाराक्रांत मनाला थोडें हलकें वाटत असावें. रेगे यांच्या नेहमींच्या कवितेंतील मनाला भुरळ घालणारी प्रतिमासृष्टि ह्या कवितांमध्यें नाहीं : त्यांत एकप्रकारचा ओकेबोकेपणा आहे; अनलंकृत कथन आहे; एकप्रकारचा bareness आहे. दुपारची वेळ आहे; ऊन टळटळीत आहे, रस्ता तापलेला आहे, भोवतालीं कोठें हिरवळ दृष्टीस पडत नाहीं—असलें शुष्क वातावरण आहे. दुःख, विषण्णता, एकाकीपणा, भ्रमनिरास ह्यांचेच सूर त्यांतून घुमत आहेत. रेगे यांच्या काव्यसृष्टींतील ह्या कवितांचें स्थान अनन्यसाधारण आहे. ह्यांतील अतिसूक्ष्म अशा उपरोधाच्या सुरानें त्यामधून व्यक्त होणाऱ्या आर्ततेला एक वेगळीच धार आणली आहे. येथें त्यांचें मन 'दुमडून गुडघे पोटाशीं' बसलेलें नाहीं : तें बरेंचसें मोकळें आहे. मात्र त्यांच्या इतर दुःखात्म कवितांमधून

**ढगाळलेल्या आभाळाचें**
**लपेटून अन्**
**गरम पांघरूण**
**माझेंहि मन**
**दुमडुन गुडघे पोटाशीं**
**बसलेलें...**

ह्याच स्थितींत आपल्याला त्यांचें मन सगळीकडे भेटतें, ह्यांत संशय नाहीं.

रेगे यांच्या कवितेचें भविष्य वर्तविणें मोठें कठीण आहे. त्यांच्या कथेप्रमाणेंच त्यांच्या कवितेचा आलेखहि उंचसखल आहे : तो एकसुरीहि नाहीं.

त्यांनीं लिहिलेल्या अनेक चटकदार ‘ किंचित् काव्यां ’ची आठवण विसरणें अशक्य आहे. त्यांतून कितीतरी जीवनांतील विसंगतींची बोचक जाण व्यक्त झाली आहे. त्यांतील निवडक ‘ काव्यां ’चा संग्रह होणें आवश्यक आहे. रेगे यांची कल्पकता असाधारण आहे. ‘ अक्षरवेल ’मधील अनेक छोट्या कवितांमधून त्यांच्या ह्या असाधारण कल्पकतेचा केवळ विलास दिसून येत आहे : ‘ वीज ’, ‘ चंद्रकोर ’, ‘ चंदन ’, ‘ सवत ’, ‘ मीरा ’, ‘ रातकिडा ’ ह्या कवितांची खरी मौज त्यांतून व्यक्त होणाऱ्या कल्पनाचमत्कृतींत आहे. अल्पावकाशांत ही कल्पनाचमत्कृति साधण्याचें कौशल्य रेगे यांच्या प्रतिभेंत आहे. त्याचप्रमाणें एखाद्या वृत्तीचें साक्षात चित्र रेखाटणें व तरळून जाणाऱ्या वातावरणाला शब्दांकित करणें हा रेगे यांच्या कवित्वशक्तीचा जणू सहजधर्म आहे. ह्या संग्रहांतील अनेक कवितांतून भर दुपारचें शुष्क वातावरण रेगे यांनीं अत्यल्प शब्दांत पकडलें आहे. परंतु रेगे यांच्या प्रतिभेचा स्थिर विलास, मला वाटतें, अद्याप गोचर व्हावयाचा आहे. त्यांच्या सर्वच लेखनांत अद्याप एक प्रकारची अस्थिरता आहे, अनिश्चितता आहे. त्यांच्या प्रतिभेच्या ठिकाणीं असणाऱ्या प्रसुप्त शक्तींची जाण रसिकांना आली आहे; परंतु तिजबद्दल विश्वास वाटावा, तिच्या जीवितकार्याची निश्चित ओळख पटावी व तिजबद्दल एकसारख्या अपेक्षा निर्माण व्हाव्या, असें कांहीं तिच्या हातून अद्याप घडावयाचें आहे. रसिक तिजकडून आज एक प्रकारच्या स्थिर कार्याची अपेक्षा करीत आहेत.

वा. ल. कुळकर्णी

मराठा ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत.
अक्षरवेल २१९८१ वि: ३१०५
क्रमांक १३६८ नों: दि: २५।८।५८
मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क्र. ९४२४

माझ्या अक्षरवेलीला
आहे आधार नभाचा,
तिच्या फांदीफांदीवर
दोले झुबका गीतांचा.

माझ्या अक्षरवेलीचें
मन चांदण्यावरती,
तिला लाटा सागराच्या
खुणावती...बोलावती...

माझ्या अक्षरवेलीला
पानें पोपटपंखांचीं,
फळेंफुलें लगडलीं
चंद्र, सूर्य, खगोलांचीं.

क्षितिजाच्या रेषेचीहि
तिला भूलभुलावण
तिच्या मनांत रंगांची
झुरे राधा गवळण.

वेड तिला छंदांचें अन्
नादगंधरूपकांचें,
हुरहूर लावितात
थेंब तिला पागोळ्यांचे.

निळया जलपृष्ठावर
लवे तरंगांचें गाणें,
माझ्या अक्षरवेलीला
पक्षी घालिती उखाणे.

तिच्या सांवळया छायेंत
घुमे स्वप्नांचा पिंगाणा,
तिच्या किमयेनें काळया
होई अनंग दिवाणा.

तिच्या अग्निशिखांखालीं
बसे बुद्ध पद्मासनीं,
क्रुसावरून येऊन
येशू घाली तिला पाणी.

तिच्या तळाशीं तेवते
नम्र वात अभंगाची,
तिला फुलविते ओंवी
योगीराज ज्ञानेशाची.

शब्द होऊन पालवी
पालविती तिची झूल,
फुले कुशींत तिचिया
अबोलीचें भावफूल

१७.७.५३

# सोनफुलोरा

मोती पिकला फुलांफुलांवर
सुवर्णकमळें खूष जहालीं
आम्रफुलांनीं सुरमा लुटला
अलिबाबाची गुहा उघडली

रानोरानीं डंवरे पांचू
पोपट फांसति हिरवा रंग
गुल्मोहराचा डौल वाढला
पळस गातसे नवा अभंग

कणसांमधुनी दूध दडालें
शाळूवरची शील झिंगली
मणि मोहरला डाळिंबाचा
तुळसाबाई वयांत आली

चिंचेवरच्या चिंवचिंव चिमण्या
घालुं लागल्या चटोर पिंगा
नाकावरती बोट ठेवितो
हंसून मिस्किल चावट भुंगा

सोनफुलोरा नव्या उन्हाचा
त्यांत फुलांचा फेर बिलोरी
पिवळे पिवळे धुंद कवडसे
वडाखालिं खेळती लगोरी.

१९४९

# गंज

घुमूं लागले मशीदींतले
   निळे पारवे...निळे पारवे
मलूल झाले गलोललेले
   पोपट हिरवे...पोपट हिरवे

सप्त समुद्रहि विषण्ण झाले
   आवरली शीडांनीं फडफड
गाभुळलेल्या चिंचा निजल्या
   बाभळिची अन् सरली बडबड

एकलकोंड्या शेवाळाचें
   मनीं वाढलें अरण्य गहिरें
रंध्रारंध्रांतील विझाले
   दिवे आंधळे सहिरेबहिरे

सतार पडली आयुष्याची
   पडदे गंजुन माळ्यावरती
पिंजऱ्यांतले ससे उमडले
   त्या गंजाच्या भस्मावरती

एप्रिल १९५०

# लाट

क्षितिजावरून
माझीया मनाच्या
अकस्मात् येते
एक प्रचंड लाट
अन् क्षणार्धांत
घेते ती कवेंत
अंबराच्या झुंबरांना

...वाटतं,
असंच पडावं बाहेर
नि यावं फिरून
ब्रह्मांडाच्या नाक्यावरून!

१९५०

# निळ्या टेकड्या

माझ्या स्वप्नांच्या गवाक्षांतून
फिरवितों मी
माझी नजर...अधीर...
क्षितिजाच्या परीघावरून
आणि दिसतात मला
मेघश्यामला
भुरक्या...धूसर
निळया टेकड्या...
पलीकडे जी दिसते आहे
भलती बुजरी
लाजलाजरी
निळी टेकडी
तीवर आहे
आकांक्षांचा
उभा माझिया दिव्य अश्वत्थ
सांवलींत ज्याच्या
असे बैसली
माझीच सांवली
कमलासनीं
होऊन ध्यानस्थ
युगायुगांची करित तपःसाधना...

१९५१

# दोन पारवे

...आणि तिथें तो
नदीपुलाच्या
कमानींतला
निळा पारवा
घुमतो.

...आणि इथें हा
या प्रमदेच्या
ओंजळींतला
फिका पारवा
झुरतो.

...आणिक तिथल्या
पारव्यास त्या
माया भारी
कमानींतल्या
काळोखाची.

...आणिक इथल्या
पारव्यास त्या
प्यारी भारी
ओंजळींतली
ऊब लोंकरी.

१९५१

# फिनिक्स

क्षणापूर्वीं होता
या राखेला
एक रेशमी, गोंडस आकार...
गव्हारी रंगाच्या कातडीखालीं
होता कणखर
पिंजरा सोनेरी
अस्थींचा करारी...
मनाच्या मखमली
डबींत होतीं
वासनांचीं अभिज्ञानें
अस्मितांचीं रसायनें
आणि आतां...
बसून माझ्या मरणाच्या बिछायतीवर
पहातों आहें मी
लपेटून
ज्वालांचें पांघरूण
वेध कधीं घेतें
माझ्या जीवनाचें अग्निपांखरूं
माझीया रक्षेच्या
पहाडामधून...

१९५१

# श्रावण

आला श्रावण श्रावण
गुच्छ रंगांचे घेऊन,
ऊनपावसाचे पक्षी
आणी ओंजळिमधून.

निळें स्वप्न कुजबुजे
हळूं पांखरांच्या कानीं,
ऊन कोंवळें दाटलें
केशराच्या रानोरानीं.

आतां मेल्या मरणाला
जिती पालवी फुटेल,
गोठलेल्या आंसवांना
पंख नवीन येतील.

आतां धरतील फेर
कवडशांचीं डाळींबें,
वर्षतील नभांतून
शाश्वताचीं निळीं टिंबें.

आला श्रावण श्रावण
ओल्या सोनपावलांनीं,
दाहि दिशा महिरल्या
यौवनाच्या मंजिऱ्यांनीं

१७.७.५३

# भुकेच्या पिराशीं

मातीच्या कुशींत
रक्ताचें गुपित
आहे लपलेलें
भुकेशीं खेळत.

स्नायूंच्या सुशींत
अस्थींचें गणित
रेंगाळत आहे
यमाशीं बोलत.

श्वासांच्या भाषेंत
नाचे झंझावात
आशांच्या नशेंत
पिशाच्चें घुमत.

आणिक माझीया
मन-मशीदींत
भुकेच्या पिराशीं
तहान तेवत !

१७.७.५३

# सोहळा

गॉलगोथाच्या टेकाडावर
जय्यत सारें तयार आहे...

सारा थाट पटला आहे
सारा घाट घटला आहे
झगा जांभळा सजला आहे
क्रूसहि अधिरा बनला आहे
खिळा खिळयाला भिडला आहे
हातोडी तडतडते आहे
किरीट कांटे खातो आहे
वरात अजुनी येणें आहे

गॉलगोथाच्या टेकाडावर
उधाण काळें वहात आहे

बाकी सगळें तयार आहे
उणीव केवळ त्याची आहे !

१७.९.५३

मराठा ग्रंथ संग्रहालय, ठाणें. स्थळप्रत.
अनुक्रम [illegible] वि: [illegible]
क्रमांक [illegible] नों: दि: [illegible]

# वसंतागमीं

वसंतागमीं
तव नयनींचीं
रानपांखरें
नाहिं बोललीं
तर उमगावें
मनास माझ्या
गारठलेल्या
पानेंझडल्या
कसें
खोडकर
हिरवें हिरवें
छटेल फसवें
चैत्रफुलांचें
वेडें कोडें ?

१७.९.५३

# फूल मनाचें

फूल मनाचें
    फुलतें आहे
झूल जरीची
    झुलवित आहे
खूळ पांघरुन
    सूरपांखरूं
गूढ तयांतिल
    उकलित आहे !

१७.१.५३

# चांद

घननीळ आभाळांत
 येती वादळाचे मेघ
क्षणीं केव्हां नकळत
 उले क्षितिजाची रेघ.
पानजाळींत केळींच्या
 सळसळतें कांहींसें
काळोखाचा रातकिडा
 सोडी जडसे उसासे.
सुटे सोसाट्याचा वारा
 त्याची चाल ओलसर
मृद्गंधाच्या कोषांत
 झुरे श्रावणाची सर.
कुठें एखादें पांखरू
 टिपी विजेचे बेदाणे
खांब तारांचे घालिती
 नभा थेंबांचीं कोंदणें.
कुठें कमळांच्या रानीं
 वाट केतकी चुकते
वळसर पागोळ्यांचे
 कुणी ओवळ माळीते.

...तोंच निंबोणीच्या आड
 दिसे चांदोबाची कोर
आणि पळसमनाला
 लागे गूढ हुरहूर.

२३.९.५३

# कोंकरूं

शिसवी...कांतिव
रगेल...ओतिव
पर्वतवक्षीं
शुभ्रपांढरा
गहिरागोरा
असे उमलला
एक धुक्याचा
सुरेख...नाजुक
लोंकरगजरा
...जणूं
ख्रिस्तानें
प्रेमभरानें
गहींवरानें
हळूं उचललें
वक्षीं धरलें
फूलकरानें
एक
गोजिरें
फेनधवल अन्
तांदुळधुतलें
सानसोनुलें
कोंकरुं इवलें!

२३.९.५३

# प्राक्तन

बेथल्हेम्च्या सुताराला
आहे झाला
मुलगा गोरा
आकाशस्थ ग्रहांनीं ज्याचें
लिहुन ठेवलें आहे
प्राक्तन :

करिल सुरू हा
मरणघडीला
परंपरागत
अपुला धंदा,
गॉल्गोथाच्या घाटीवरती
जुळवित नातीं
खिळ्यांफळ्यांशीं
मारित अन्
मरणाला रांधा !

१.१०.५३

# गॉलगोथा

गॉलगोथा !
कवट्यांचा डोंगरमाथा ! !
इथेंच लिहिला
खुनी जथ्यानें
एक प्रमाथी जीवनगाथा !

गॉलगोथा !
मृत्यूची गहिरी संथा ! !
इथें कोरिली
प्रमत्ततेनें
एक प्रपाती शांतिसंहिता !

गॉलगोथा !
बेहोषीचा थुंकीचोथा ! !
इथेंच उलला
तत्परतेनें
किरिटावरती सलता कांटा !

गॉलगोथा !
तांबडमातीचा उंचवटा ! !
इथेंच जमला
आपुलकीनें
क्रुसासाठिं ना लांकुडफाटा !

४.१०.५३

## साद

कूस घेउनी
खांद्यावरती
रखडत होतों
मीच निघालों
मरणाचा मी
नटून यात्री
दुपारच्या भर
अपूर्व रात्रीं...

पडली होती
घशास कोरड
होतें बनलें
पाउलही जड
पाठीवरती
सडसड आसुड
माथ्यावरती
कांट्यांचा फड...

आणि अचानक
झाले भकभक
बुबळांभंवतीं
प्राणहि गोळा
आणि म्हणालें
पाऊल मला :
नाहीं येववत
आतां पुढती...

दणकट माझा
खंदा खांदा
पुरता थकला
दुखूं लागला
रक्त ठिबकतें
चाटुं लागला...

नजरेपुढती
आले हत्ती
निळ्याजांभळ्या
काळोखाचे
आणिक माझें
श्रमलें...श्रमलें
गरिब बिचारें
शरिर एकलें

घालुं लागलें
साद
मरीयम मागूदालिनला...

४.१०.५३

## ती अशीच होती सकाळ...

ती अशीच होती
सकाळ आरसपानी
हिरव्या लिंबापरी कोंवळी
गोजिरवाणी
त्या दिवशींही
असेच होते
गुच्छ उन्हाचे फुलले
छायांच्या ताटव्यांत
रिमझिम
कडुशांचे फुलझेले

अजून नव्हती
नीज वितळली
आभाळाच्या डोळयांवरची
नव्हति संपली
भूपभुपाळी
जाईजुईच्या पागोळयांची

असाच होता
असाच अगदीं
नितळ कागदी
पळस डंवरला
समोरचा शेवगा
फुलांनीं
गर्द निथळला

त्या दिवशींहि
मनांत माझ्या
अशींच हलकें
हलकें झुलली
तुझी रेशमी
मऊ बदामी
चाल मेंदिची
लालस ओली
आणिक होतीं
वाट विसरलीं
निळसर...निळसर
स्वप्नें माझीं
तुझ्या ओलसर
तलम कुंतलीं

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क्र. ८४२४

अशीच होती
अशीच अगदीं
चैत्रपालवी
छेडित अपुली
नवखी...बुजरी
अभिसाराची
छचोर धारा
असाच होता
रुंजी घालित
गुंजांभंवतीं
कातळवारा

...आज परंतु
याच उमलत्या

उन्हांत झुरती
अगीनपक्षी
युगविरहाचे
आणिक अपुले
पंख पालवित
चिणित रहाती
तुझ्याच लटक्या
रुसव्याभंवतीं
नाजुक नक्षी !

२.२.५४

## हळद उन्हाची...

झाडांच्या शेंड्यावरती
हळद उन्हाची खळ्खळ्ते
वाऱ्याच्या पंखावरती
पिंपळपालवि सळ्सळ्ते

होडीच्या शीडावरती
एक पांखरूं किल्बिल्तें
कांठाच्या देंठावरती
खुळी मासळी झिळ्मिळ्ते

वाळूच्या दुलईवरती
निळी शिंपली हुरहुर्ते
माळाच्या भाळावरती
पिवळें जावळ भुर्भुर्तें

क्षितिजाच्या धारेवरती
भुरी टेकडी झुर्झुर्ते
पिंगट कौलारावरती
वेल धुराची सर्सर्ते

पाण्याच्या पाठीवरती
वर्तुळ लाडिक थर्थर्तें
स्वप्नांच्या वाटेवरती
मनांत कांहीं शिर्शिर्तें

२२.२.५४

## ऋषी

हे कभिन्नकाळे
तुकतुकणारे
ओबडधोबड
खडक नागडे...

थंड तयांच्या
शिसवी पाठी
स्नायूंच्या घन
बांधिव गांठी
धमन्यांमध्यें
कैक वादळें
कळे उन्हाचे
ओटींपोटीं...

आभाळाच्या
वडाखालतीं
मृगाजीन
मातीचें घालुन
कृष्णसांवळे
ऋषी बैसले
निःशब्दाच्या
छताखालतीं
घालुन चपखल
हें बध्दासन...

मात्र तयांची
अर्धोन्मीलित
निळी पापणी
वळली ...खिळली
क्षितिजावरती
जिथें तरळते
एक चांदणी !

२.३.५४

## पानझड

मातीच्या कुशींतून डोकावणारें
लुसलुशीत हिरवें
पाहून पातें
पानांना येते कोंवळी चाहूल
चैत्राच्या येण्याची अन्...

आधार सोडून
फांद्यांचा तीं
झेंपावतात
धरणीवरती
कराया साजरा नव्याचा सोहळा...

नि
कुठेंतरी कुणी
एखादा म्हातारा
म्हणतो :

पहा हा
आला हिंवाळा
गळूं लागला
पानांचा पाचोळा...

२.३.५४

# आतांच कुठेंशी...

आतांच कुठेंशी
फुलोरूं लागली
तांबूस, हिरवी
कोंवळी पालवी

परीटघडीच्या
नवीन नभाला
खुलवूं लागली
आकाशी झिलई

आतांच कुठेंशी
पाण्याच्या कांठाशीं
हिंदोळूं लागली
रेशमी पाकळी

जुन्या त्या पुलाच्या
कमानीखालतीं
भरारूं लागली
एकली पाकोळी

आतांच कुठेंशी
झोंपून उठले
भुरके धूसर
डोंगर अंजिरी

गारशा उन्हांत
नुकत्या नहाल्या
अमल श्यामल
तुळसमंजिरी

आतांच कुठेंशी
कमलपाकळी
उघडूं लागली
सुगंधी ओंजळी

प्रीतीच्या भुंग्यांना
अनंगरंगांत
कमळमिठीची
भोंवळ भोंवली

आतांच कुठेंशी
मंदशा मेंदीनें
भारलीं पैंजणें
तुझीया पायीचीं

लाजली लाजरी
पोपटी पारवी
चंद्राची कोयरी
तुझीया भाळींची

आतांच कुठेंशी
गुलाबी ओंठांशीं
लटक्या स्मिताचा
उमटे आलेख

गालींच्या खळीला
कोंवळ्या तीळाचा
एरिंग घालिती
उखाणा सुरेख

आतांच कुठेंशी
मोहरूं लागली
नखानखांवर
केशरकस्तुरी

डोळ्यांचीं पांखरें
सुरमा पिऊन
अचूक दाविती
मदनचातुरी

आतांच कुठेंशी
लागते आहे
गुल्मोहराला
पळसाची दृष्ट

तुझीच्या सृष्टीच्या
नवीन दृष्टींत
लागतें दिसाया
आपुलें अदृष्ट!

१८.३.५४

## शुभ्र दाढीचा जादूगार

लाथ मारीन
तेथें काढीन
सात पुरुष
खोल पाणी
अशी वल्गना करणाऱ्यांनीं
कोरला होता
तो
अहंतेचा सागर...

ज्याच्या प्रमत्त लाटांवरून
नम्र पावलें
टाकित अलगद
सहजच गेला
संथ गतीनें
तापत्रयाच्या सीमेपार
शुभ्र दाढीचा जादूगार...

२०.३.५४

# पांखरें थेंबांचीं

श्रावणसरीची
केवढी चालली आहे ही धांदल !

येते ती केव्हां
जाते ती केव्हां
शिंपीत हिरवा
सोनेरी गारवा
कळतहि नाहीं ऋतुराणीलाहि !

आणि...
त्या तिथें तीं
चीटचिटुकलीं
पांखरें थेंबांचीं
बसून झुकतीं
तारांच्यावरती
दाटीनें वाटीनें
लाजाळू लोभस
विसकटलेलीं
पिसें भिजलेलीं
उन्हाच्या चोंचीनें...सावरीतपणें...

२५.३.५४

## पाऊसपक्षी

पाउसपक्षी
कृष्णसांवळा
शाळिग्रामसा
श्यामलसुंदर
क्षितिजाच्या
थरथर तारेवर
बसुन पालवित
पंख ढगांचे
गोंजारित अन्
पिसें विजेचीं
वादळचोंचीनें...डौलानं
मृद्गंधाला
घेऊन वक्षीं
...पाउसपक्षी !

१९.६.५४

# शेवगा

फुलवुन पंखा
        शुभ्र फुलांचा
तुरा टपोरा
        तलम उन्हाचा
टाकित टाकित
        सुने उसासे
टिपे शेवगा
        धुंद कवडसे !

२१.६.५४

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थलप्रत.
अनुक्रम २१९८१ वि: काव्य
क्रमांक १३८८८ नोंः दिः २५/५/५८

## चेटूक

श्रावणाची सर
फुलांच्या पायांनीं
येते आणि जाते
चेटूक करूनी

पानें झाडीतात
पागोळयांची लव
फुलांच्या कोषांत
ओलेतें मार्दव

वाऱ्याच्या चालींत
हिरवी चाहूल
अंगणीं वाजतें
थेंबांचें पाऊल

पिसें फुलारतें
उन्हाचें लेंकरूं
लाडें हुंबरतें
छायेचें वांसरूं

आभाळीं झुलतें
निळईची बाग
इंद्रधनूला ये
रेशमाची जाग

आणिक मनाच्या
वळचणीपाशीं
घुमे पारव्यांची
जोडी सांवळीशी

२१.६.५४

# घार

पिवळी पिवळी
जर्द दुपार
सुनी नभाची
गर्द कपार
आणि दूरवर
लावी हुरहुर
ठिपका होउन
एकच घार
एकच घार…

२१.६.५४

# नागीण

तुरे फुलवुनी
शुभ्र शिडांचे
करीत हितगुज
बसल्या होड्या
नदिकांठाशीं
स्तब्ध जळावर
लहरी उठती
रेशमकांठी
अन् आकाशी

नजर लावुनी
बसले भुरके
करडे डोंगर
क्षितिजावरती
उंच कड्यावर
टिंबें होउन
बकऱ्या हिरवा
चारा खाती

दूर पोपटी
कुरणावरती
झुरे कुणाची
विरही बन्सी
निळ्या जळाचा
नितळ आरसा

रूप न्यहाळी
तयांत हंसी

मान टाकुनी
मातीवरती
रेघ पहुडली
चाकोरीची
आणि उन्हाची
पिवळी धम्मक
मंथर नागिण
कात टाकिते
या छायांची

५.९.५४

# चांदणी

कृष्ण ढगाच्या
कुशींत शिरली
ठळक चांदणी

लिंबाखालीं
बसे सांवली
चिंब होउनी

आषाढाच्या
पानीं दडलीं
श्रावणगाणीं

साळुंकीच्या
पंखावरती
दोन गौळणी

क्षितिजावर त्या
निळया टेंकडया
बुडल्या मौनीं

शिळा सांवळया
स्तब्ध बैसल्या
मांड ठोकुनी

घुमतां रानीं
शीळ कुणाची
आणि त्या क्षणीं

उगाच लाजे
मेघमिठींतिल
फिकट चांदणी

७.९.५४

# वीज

आषाढघनाच्या
फुलकोषांतुन
गर्भरेशमी वीज
निखळते

...जणूं दिगंबर
पुरूरव्याला
त्यजुन उर्वशी
निर्दय निघते...

२१.६.५४

# कळी

मत्प्रीतीच्या कबरीपाशीं
डोलत आहे
फक्त...फक्त त्या आठवणींची
एक कळी इवलीशी
नितळ...निरागस
फिकट जराशी
पुसट पुसटशी

मत्प्रीतीच्या कबरीपाशीं.

२२.६.५४

# पक्षी उन्हाचा

तृप्त मनाच्या
गर्भरेशमी
श्रावणधारा
पहापहातां
येती...
जाती...
मांडुन गोंडस
कांच–तळ्यांचा
लख्ख् पसारा...

आणि ढगाच्या
घरट्यामधला
पक्षि उन्हाचा
उतरुन खालीं
फुलपायांनीं
संथ डुंबतो
त्यांत
फुलवुनी
किरणपिसारा !

७.९.५४

# टिंबें

हीं ओल्या डांबररस्त्यावरचीं
मिणमिण टिंबें
उदासवाणीं
मंद दिव्यांचीं...

भिजली लवलव
पानांखालीं
निजलेल्या पक्ष्यांची...

कडेकडेनें उभे
कांपरे...शहारलेले
हे झाडांचे
नग्न सापळे···

ढगाळलेल्या आभाळाचें
लपेटून अन्
गरम पांघरुण
माझेंहि मन
दुमडुन गुडघे पोटाशीं
बसलेलें...

१.९.५४

# दुपार

माध्यावरतीं उन्हें चढावीं
पावलांत सांवल्या विराव्या
घाटावरतीं शुभ्र धुण्यांच्या
पाकोळ्या अन् मंद झुलाव्या

डोंगर व्हावे पेंगुळलेले
पोफळबागा सुस्त निजाव्या
अंगणांतल्या हौदावरती
तहानलेल्या मैना याव्या

लुकलुकणारे गोल कवडसे
निंबाच्या छायेंत बसावे
खारीचें बावरें जोडपें
बकुळीखालीं क्षणिक दिसावें

कुरणाच्या हिरवळींत ओल्या
ऊनहि हिरवें होउन जावें
कुठें कधींचें नांगरलेलें
शेत पावसासाठिं झुरावें

१०.९.५४

# चांदणें

झुलतें आहे लाटांवरती
पांचूचें रेशमी चांदणें
दीपगृहांतिल फूलपांखरूं
गुणगुणतें मिणमिणतें गाणें

दूर क्षितीजाशीं हेलावे
तुकडा शीडाच्या पंखाचा
पानांच्या मृदु कुशींत निजला
झुबका छायांच्या स्वप्नांचा

पाण्याच्या गर्भांत दिव्यांच्या
पागोळ्यांच्या शांत शिंपल्या
पुळणीवरच्या वाळूवरती
जखमा लाटांच्या हुरहुरल्या

या जखमांवर घालित फुंकर
वारा फिरतो आहे झुळझुळ
झिजतो आहे ढग माथ्यावर
कुणा चांदणीसाठीं तिळतिळ

१२.९.५४

## जास्वंदीचें फूल

गर्भाच्या
झिरझिरीत फुलकोषांत
पहुडलों आहें मी
प्राणांची कळी होऊन...
अंधाराच्या
जांभळ्या दुलईचें
गुलाबकांठी
कोरेंकरकरीत पान
अंगावर ओढून...
गुडघे छातीशीं दुमडून
गुडुप् करून...
स्वप्नांच्या शहाळ्यांतील
ओरबाडीत
लुसलुशीत मलई
बसलों आहें मी
केव्हांचा
आदिमानवाच्या मातीला
चढवीत
लखलखीत...नवी झिलई

...आतां थोड्या वेळानें
कुठून तरी...
कसली तरी...
येईल रेशमी वेदना
जी विजेचें होऊन

पारदर्शक पातें
फाडून काढील
हा गर्भाचा देव्हारा
अन्
बांधावरल्या जास्वंदीवर
हिंदोळूं लागेल
पानांच्या पाळण्यांत
एक इवलालें
लाल...लाल...कोंवळें
फूल जास्वंदीचें...

२०.९.५४

# रानकबूतर

चोरपावलीं वहाणारा
मंद वारा...
क्षितिजाचें उसें करून
लोळणारे
धुंद डोंगर...
निवडुंगाच्या फडांत
चिंवचिंवणाऱ्या
सांवल्यांच्या चिमण्या...
पाण्याच्या पाठीवर
झुकलेल्या
चांदण्याच्या वेण्या...
बिलोरी ढगांच्या मनांत
लपलेली
चंद्राची कोर...
आकाशाच्या डोलकाठीवर
बसलेलें
चांदणीचें पोर...
अन् दूर कुठेंतरी
घुमणारें
तुझ्यासाठीं झुरणारें
माझ्या मनाचें
रानकबूतर...

२०.९.५४

# ज्यूडास

काळोखाच्या फांदीवरती
विजेचीं पातीं
लखलखताहेत
वादळाच्या तटाभोंवतीं
द्रोहाच्या रात्रीं
भगभगताहेत
चुरगाळलेल्या पाचोळ्यांत
विकल्पाच्या पागोळ्या
ठिबकताहेत
आभाळाच्या पोकळीखालीं
द्वेषाचीं वाघळें
लटकताहेत
एका झाडाच्या खांदीवरती
एक दोरी
हलते आहे
त्या दोरीच्या फांसामधून
एक प्रेत
लोंबतें आहे
त्या प्रेताच्या अंवतींभंवतीं
भयाण वारे
भणभणताहेत
आणि त्याच्या खिशामध्यें
तीस नाणीं
छनूछनूताहेत !

२४.९.५४

# माझा अश्वत्थ

माझ्या अश्वत्थाचीं मुळें
चाललीं आहेत खोल···खोल···
मातीच्या कक्षा फोडीत
पाताळाच्या काळ्या कातळावरून
सळसळणाऱ्या शिसवी सर्पिणीसारखीं...
ओल्या काळोखाच्या
भुसभुशीत किनाऱ्यावर
उमटल्या आहेत त्यांच्या जन्मखुणा···
फुटलीं आहेत त्यांना
स्वप्नांचीं आसुसलेलीं हिरवीं बोटें
अमावास्येच्या तेजस्वी गर्भाचा
वेध घेणारीं...
उरांत त्यांच्या पेटलीं आहेत
सहस्र जखमांचीं
विराट क्षितिजें...
इंद्रधनुष्याच्या डोलकाठीवर
पेंगताहेत
अक्षांशरेखांशांचीं पांखरें
लाव्हांच्या धारांखालीं भिजलेलीं...
अन् मातीच्या वक्षावर
विसावलेली
अज्ञाताची काजळलाट
पिते आहे अंधाराची पौर्णिमा
नक्षत्रांच्या सांवलीखालीं···
तरीहि तीं

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क. ८४२४
शाखा

चाललीं आहेत...चाललीं आहेत
खोल...खोल...
रापीत...रापीत...
काळोखांत बुडालेल्या मातीच्या कक्षा...
चांचपीत...चांचपीत...
स्वप्नांच्या हिरव्या बोटांनीं
अमावास्येच्या गर्भाची गारठलेली रक्षा...
अखेर एकदांची
संपते त्यांची वाट
विरते मातीची लाट
फुटतें काळोखाचें गवाक्ष
अन् होऊन तृणाचीं पातीं
पाहूं लागतात तीं
त्याच्या झरोक्यांतून
दंवाच्या भरल्या डोळ्यांनीं
नव्या आकाशाची
गुलाबी पाकळी
चांदणीच्या पदराखालीं उमलणारी...
चांदणीच्या अधरावरती दुमडणारी...

१.५.५५

# आली वसंताची लाट

माझ्या पदराआडच्या
   मैना कुजबुजतात :
आली हिरवें नेसून
   पहा वसंताची लाट

माझ्या दंडांत रुतला
   कांठ चोळीच्या खणाचा
म्हणे : पहा पालवला
   वृक्ष चैत्रपालवीचा

बोले माझी चंद्रकळा
   नक्षत्रांच्या ठिपक्यांची :
पंखावरती वाऱ्याच्या
   फुले नक्षी सुगंधाची

नदीकांठानं गेलेली
   वदे वाट जास्वंदीची :
पांखरांच्या स्वप्नांतील
   लवे वेल सांवल्यांची

क्षितिजाच्या उंबऱ्यांत
   चांदणी मी बावरली
वाट पहाते केव्हांची
   वसंताची गोठलेली

११.५.५५

# फुंकर

अशीच व्हावी युगायुगांची
सदैव ओली जखम ठणकती
अशी उरावर लाट फुटावी
दुःखाची, तडकावी माती

अशीच यावी काळोखावर
उमलुन अवसेची चाकोरी
अशी वेदना झुलत रहावी
झुरत रहावी ही पाकोळी

स्तंभावरती या तृष्णेच्या
असा असावा लोंबत ख्रिस्त
मुकी भूकहि मरणाभंवतीं
अशिच असावी घालत गस्त

चांदण्यांतली ही भुताटकी
अशी बसावी मानगुटीवर
आणि दिशांच्या देव्हाऱ्यांतुन
यावी नक्षत्रांची फुंकर

११.५.५५

## चंद्रकोर

अंधाराची विवस्त्र चंद्रकोर
करून आडोसा
नक्षत्रांच्या पानांचा
बसली आहे
आकाशगंगेंत पाय सोडून
नेब्यूल्यांशीं खेळत...

अन् क्षितिजाच्या निखळलेल्या रेषेवर
उभा राहिलेला मी...धूमकेतु···
पहातों आहे तुला...
चोरून...त्या चंद्रकोरीसारखी...
आठवणींशीं खेळत बसलेली
वर्तुळांच्या पालवीचा
आडोसा करून···

१.३.५८

मराठा ... स्वतंत्र
अनुक्रम २१६८१ वि: काव्य
क्रमांक २३५८६ नों: दि: २५.५.५८

# माझ्या हातांतील माती म्हणते आहे....

माझ्या हातांतील
मातो म्हणते आहे :
मला हिरव्या गवतांत
लोळायचें आहे

माझ्या रक्तांतील
गति म्हणते आहे :
मला डोंगराची भिंगरी
फिरवायची आहे

माझ्या दंडांतील
बंड म्हणतें आहे :
मला इंद्राचें धनुष्य
उचलायचें आहे

माझ्या प्राणांतील
गाणें म्हणतें आहे :
मला चांदण्यांशीं
रिंगण धरायचें आहे

माझ्या आकाशांतील
प्रकाश म्हणतो आहे :
मला ब्रह्माचें कमळ
खुडायचें आहें

माझ्या अस्मितेचें
भस्म म्हणतें आहे :
मला फिनिक्सचें अंडें
उबवायचें आहे

१३.५.५५

## स्वप्नाचा ठिपका

आकाशाच्या पानावर
उन्हाचे ठिपके येऊन बसतात
डोहाच्या कवचावर
सांवलीचें पांखरूं चोंच मारून जातें
हिरव्या शेवाळावर
लवचिक उलगडणारें चेटूक
मला येऊन बिलगतें
अन् अकस्मात्...
त्याच्या पाकळीवर थरारणारा
मेंदीच्या नखाचा
तो गोरा अंगठा
मला पाहून लाजतो...

माझ्या मनाच्या पानावर
एक स्वप्नाचा ठिपका
रेशीम शिंपूं लागतो

१.३.५५

# चंदन

आषाढानें खालीं लवून
दिलें पालवीला आलिंगन
अन् विजेच्या ओठांनीं
तो लागला घेऊं
क्षितिजाचें जांभळें चुंबन
तेव्हां वादळाच्या कवेंत वितळलेली मातीहि झाली
लाजेनं हिरवी
अन् दरवळलें तिच्या वक्षांवर
श्रावणाचें कोंवळें चंदन...

१.३.५५

# माती

माझ्या थडग्यांतला मी...
मीच माझं वाद्य होतों
अन् मीच ऐकत बसतों
माझ्या गाण्याचे सूर···

या थडग्याचं कवच फुटल्याशिवाय
हें गाणं जिवंत तरी होणार कसं?
अन् हें गाणं जिवंत झाल्याशिवाय
हें कवच तरी फुटणार कसं?

आतां कल्पांतापर्यंत
हेंच कवच कुरवाळीत बसायचं...
हेंच गाणं गात रहायचं...
मातीचं वाद्य..
मातीचं गाणं..
मातीचे सूर...
अन् मातीचा मी!

१.३.५५

## आकाशाची जखम

माझ्या मनाला झाली आहे
आकाशाची जखम
जी मत्स्यावतारापासून
चाटीत आलों आहें मी
युगानुयुगें
दिशांच्या जिभा करून...
माझ्या या जखमेच्या रिंगणांत
भटकतो आहे
कलंकीचा घोडा सैरावैरा
विद्रोहाची आयाळ पिंजारून पिसाळलेली...
माझ्या या जखमेच्या अंगणांत
वामनाची चिमुकली तुळस
राहिली आहे उभी
बळीच्या मस्तकावर
तिसरें पाऊल रोंवून...
माझ्या या जखमेच्या डोहांत
वेदनेनं घेतलं आहे
राधेचं रूप
अन् कृष्णाची मुरली
यमुनेच्या कांठीं
घुमवते आहे
व्यथेचा पंचम...
माझी ही जखम
ठणकते आहे...ठणकते आहे
जयद्रथाच्या विश्वासघातानं

माझी ही जखम
सणकते आहे...
माझी ही जखम
रडते आहे...रडते आहे
पांचालांच्या अपौरुषत्वानं
माझी ही जखम
सडते आहे...
माझ्या जखमेच्या झाडाखालीं
रजस्वला द्रौपदी बसली आहे
दुःशासनाच्या नांवाचं कुंकू लावून...
बृहन्नडा घेते आहे कथ्थकाचे धडे
अन् बल्लव बनलेला बलभीम भीम
कीचकाच्या स्वैंपाकघरांत
बसला आहे निवडीत
तांदळांतले गोटे...खडे...
माझ्या मनाच्या जखमेंत
अमावास्येचा कलश उपडी झाला आहे
अन् कण्हणारा दुर्योधन
बसला आहे तिच्या कांठावर
शरपंजर भीष्माला
उत्तरायणाचें आमीष दाखवीत...
माझ्या मनाच्या जखमेंत
कर्णाच्या रथाचं चक्र
आक्रोश करतं आहे...
सुईच्या अग्रावरील मातीखालीं
वेडा द्रोणाचार्य किंचाळतो आहे:
    नरो वा कुंजरो वा
    नरो वा कुंजरो वा

माझ्या मनाची जखम
पेटली आहे...पेटली आहे...
वेडीपिशी झाली आहे
तिच्या उरांत
आकाश खात
घटोत्कच बसला आहे...
तिच्या चक्रांत
वाटविसरला अभिमन्यू
उत्तरेचा गर्भ शोधतो आहे...
तिच्या वळणावर
दबा धरून
अश्वत्थामा राहिला आहे...
तिच्या कपारींतून
नरकाच्या वाटेनं
शकुनीच्या पटावरच्या
कवड्या कुरवाळीत
पांडवांचा जुगारी जथा चालला आहे...
त्यांतल्या त्यांत
एवढंच तिला हलकं हलकं वाटतं आहे
युधिष्ठिराचं इमानी कुत्रं
मागें मागें घोंटाळतं आहे
मऊ...ओल्याशार जिभेनं
माझी जखम चाटतं आहे...
माझ्या जखमेला तेवढंच सुख होतं आहे
तेवढंच बरं वाटतं आहे...

माझ्या मनाला
आकाशाची जखम झाली आहे...

४.३.५५

# वेदनांचें कथ्थक

तुझ्या ओल्या केसांची लाट
सुगंधाच्या किनाऱ्यावर जाऊन फुटते
अन् तिच्या फेसांतून उमलणारा
चांदण्याचा मनमोर
माझ्या इंद्रधनुष्याच्या कमानीखालीं
पिसारा फुलवून
करूं लागतो वेदनांचें कथ्थक...

तुझ्या नखांच्या पाकळयांवर बसलेलीं
मेंदीचीं वेडीं पांखरं
धूमकेतूच्या वाटेवर भुरभुरूं लागतात
अन् त्यांच्या प्रतीक्षेंतून उमटणारी
रंगाची कमळवेल
कोरूं लागते
चंद्रकलांचीं सोळा लेणीं
फुलपंख फुलारून
माझ्या स्वप्नांच्या मनोऱ्याखालीं...

मातीच्या डहाळीवर पडते
आषाढाची सांवट
अन् काळ्या धुळीच्या कानशिलांतून
उसासणाऱ्या श्रावणाच्या हिरव्या वाफेखालीं
गुदमरून जातो
माझ्या स्वप्नांचा मनोरा...
लागतें वेड
वेदनांच्या कथ्थकाला...

१९.५.५५

# सवत

मला पक्कं ठाऊक आहे :
त्याचं प्रेम दोघींवर आहे.
एक – मी
अन् दुसरी – ती
त्याच्या आठवणींतली

त्या आठवणींतलीला
मला झिंज्या धरून
बाहेर काढायची आहे...
पण...पण...
त्याच्या आठवणींतली ती ती
ती मीच नसेन कशावरून ?

१९.५.५५

# उंदीर

माझ्या पुस्तकांच्या स्टँडवर
एक उंदीर रहातो
ख्रिस्ताच्या कोंकरासारखा
केंविलवाणा...लुसलुशीत...
त्याच्या डोळ्यांचीं बुबळं
भीतीचीं केलेलीं आहेत,
कसल्यातरी अनोळखीपणाच्या खोबणींत
तीं चिकटवलेलीं आहेत
स्वतःच्याच सांवलींत त्याला
क्षणोक्षणीं दिसत असतो
मांजरांचा कळप
भुकेच्या मृगजळांत डुंबत असलेला...
साप समजून स्वतःच्याच शेपटीला
पळत सुटतो तो
शांकरभाष्याच्या पोथीवरची गोंद चाटीत...
भूक लागली म्हणजे
कुरकुरतो तो
कारकुनाच्या बोरूसारखा
अन् मोठ्या विश्वासानं
पुस्तकाच्या स्टँडवर चढून
कुरतडूं लागतो
एखादं पुस्तक...

केंवळ त्याच्या...त्याच्या भुकेसाठीं
अलीकडे मला वारंवार

पुस्तकें खरेदी करावीं लागतात...
केवळ माझ्या या केंविलवाण्या
लुसलुशीत
भिऱ्या
उंदरासाठीं !

१९.५.५५

## भूत

हें वाचा नसलेलें
गूढाचें भूत
आपल्याच सांवलींतून उठतें
अन् उलटया पायांत
संचिताचे घुंगुर बांधून नाचूं लागतें...

त्याक्षणीं फुटतात
विषारी नांग्या
भविष्याच्या मोहराला
अन् आकाशाच्या मृदुंगांतून
डुचमळूं लागतो
विजेचा त्रिताल
गर्भांतील अर्भकांना भिवविणारा...

१९.५.५५

# मी वादळ होऊन येत्यें...

मी वादळ होऊन येत्यें
वाटतं
आतां तरी
माझ्या किनाऱ्यावर उमटलेल्या
त्याच्या पावलाच्या खुणा
मला पुसून टाकतां येतील...
पण तीं पावलं तशींच रहातात
माझ्या किनाऱ्यावरील वाळूला डसलेलीं...
अन् मग माझ्या लक्षांत येतं
हीं पावलं अशींच रहाणार
अशींच रहाणार
अखेरपर्यंत माझ्या स्वप्नांचे लचके तोडीत...
कारण
माझ्याच अश्रूंनीं भिजलेल्या वाळूवर
उमटले आहेत त्यांचे व्रण
जे कुठल्याच वादळाला
कधींच पुसतां येणार नाहींत...
कधींच पुसतां येणार नाहींत...

१९.५.५५

# भास

तुझ्यामाझ्या वाटा
वेगळया झाल्या त्या ठिकाणीं
भिरभिरतो आहे
केव्हांपासून
काजव्यांचा मिणमिणता थवा

मला वेड्याला मात्र
उगीचच वाटतं कीं
ती तूंच आली आहेस
चांदण्यांची वाट होऊन
माझी पुन्हां वाट पहाण्यासाठीं...

२०.५.५५

# ज्वाला

तुझा घोडा तांबडा आहे
जास्वंदीच्या परडींतील गुंजेसारखा...
माझा घोडा पांढरा आहे
ढगांच्या ओंजळींतील कबुतरासारखा...
पण हे दोन घोडे
चौखूर उधळतात
खांद्याला खांदा भिडवून
तेव्हां वाटतं,
एक गुलाबी ज्वालाच उडते आहे
धुक्याचं फूलपांखरूं होऊन...

२२.५.५५

# रातकिडा

पावसाची मुसळधार
नुकतीच थांबली आहे
अन् बकुळीच्या पानजाळींत जळणाऱ्या
काजव्यांच्या प्रकाशांत
रातकिडा गातो आहे
काळोखाचा ओला अभंग
भेसुराच्या एकतारीवर..

२२.५.५५

## वारा भणाणा वहात होता...

वारा भणाणा वहात होता
एका दरींत
रात्रीच्या ओंजळींत
एक ज्योतीची चांदणी
घुमत होती

वारा भणाणा वहात होता
एका दरींत
मृत्यूच्या पानजाळींत
एक ज्योतीची गौळण
पहुडली होती

वारा भणाणा वहात होता
एका दरींत
चांदणीच्या चोंचींत
चालला होता एकांत
रात्रीचा मृत्यूशीं...

गौळणीला राहिला होता गर्भ
विझलेल्या ज्योतीचा...
उजाडलेल्या काळोखाचा...

२८.१०.५५

# दोन आत्मचरित्रें

## १–व्हॅन गॉव्

मी
        व्हॅन गॉव्...
मी
सूर्यफुलांच्या शय्येवर
निजलों एका वेश्येला घेऊन
अन् दिला तिला
माझाच एक कान कापून...
        ई ऽ ऽ ऽ ऽ
अखेर हिरव्या सांवल्यांच्या डोहांत
आत्महत्त्या केली मीं
तिची ती
उन्हाची
पिवळीजर्द...विवस्त्र किंकाळी ऐकून

## २–पॉल् गोगाँ

मी
        पॉल् गोगाँ...
मी
माझा संसार
मातींत कालवला
अन् त्याला आकाशाच्या थडग्यांत पुरून
ताहितीच्या
काळया नागड्या मातीशीं
रंगरेषांचं मैथुन केलं !

२८.१०.५५

# ७ नोव्हेंबर १९०५

प्लेग... प्लेग... प्लेग...
जणूं उभ्या हुबळी गांवाच्याच
आली आहे खांकेंत
प्लेगची गांठ
लोक मरताहेत त्याला कांहीं सुमार !
सकाळपासनं प्रेतांचे पास लिहून लिहून
दुखायला आले हात...
आणखी एक आलं हें तशांत !
करीत होता म्हणे धारवाडला मास्तरकी
मग इथं कशाला आला
मरायला फुकाफुकी ?...
काय नांव म्हणालांत ?
कृष्णाजी
केशव
दामले ?
चला, सुटले बिचारे !
आतां नाहीं अपमान गिळावा लागणार
कीं नाहीं दारिद्र्याचा उंदीर चावणार
आतां...
हर्ष खेद ते मावळले
हास्य निमालें
अश्रु पळाले...

३०.१०.५५

## उडाला तर कावळा...

उडाला तर कावळा
बुडाला तर बेडूक

सदैव चघळावें
हें व्यवहाराचें हाडूक
अन् नाहींच जमला
हा दोन दरडींचा डाव
तर खुशाल काढावें दिवाळें
नि व्हावें मोकळें
फुंकून गांठचें किडूकमिडूक

कॉव्...कॉव्...
डरॉव्...डरॉव्...

७.११.५५

## हाडांची दरी

ही आहे एक
    हाडांची दरी
        भुरी...तपकिरी
            कबरी...गहिरी
भरली आहे ही तुडुंब
त्यांच्या मातीनें
अन् फुटलें आहे तिच्यावर
सूर्यास्ताचें मालवलेलें झुंबर...

या हाडांच्या बांसरीमधून
भटकते आहे
काळोखाचा मागोवा घेत
पाऱ्याच्या अंगाची
एक तेजस्वी ब्रह्मझुळुक
हाडांच्या बरगड्यांवर उगवते
शहाऱ्यांची पहाट
आपापसांत तीं कुजबुजूं लागतात
नितळ कांचेचे अनंग शब्द...
        आकाश मातीला बोलावतें आहे
        माती रतीला खुणावते आहे
अन् एक कवटीचं हाड
        पुकारतं आहे...
        नाहीं म्हणा...
        नाहीं म्हणा...
ही कातड्याची पहाट आम्हांस नको आहे
हें आकाशाचं थडगं आम्हांला फोडायचं आहे

मराठा ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत.
अनुक्रम ७७ २७५४१ वि: काव्य
क्रमांक ९३५५५ नों: दि: २५।५।५

ब्रह्मझुळुक म्हणते :

बोला···बोला...लौकर बोला
आहे का हें मान्य तुम्हांला
आषाढाचं आमंत्रण ?
सृजनाचं निमंत्रण ?
ही पहा...ही पहा...
व्यापूं लागली
अश्वमेधाच्या हिरव्या घोड्याची
जरतारी सांवली
त्रिभुवनाचें हिरण्यगर्भी मखर
अन् मदनाच्या धमन्यांमधून
ऐकूं येऊं लागला
दीपत्काशाचा लखलखीत टणत्कार...

गुडघ्याचं हाड बरगडीच्या हाडाला म्हणतं :

कळीच्या सांपळ्यांत
दबा धरून बसला आहे
खोबऱ्याचा तुकडा...
जर का तूं भुललास
त्याच्या कुबट वासाला
तर फसलासच समज
या रक्तामांसांच्या क्षुद्र मडक्यांत...
कितीहि झालं तरी
आपण आहोंत
रांगड्या शिपायांचीं नागडीं हाडं
रांगडे शिपाई :
जे निघाले
घरादारांवर अंगार उधळीत
बायकांना शय्येवरच सोडून...

रांगडे शिपाई
ज्यांनीं कदर केली नाहीं
बिगुलाच्या हांकेसाठीं
आयाबहिणींच्या ऊरफोड्या आक्रोशाची
रांगडे शिपाई
ज्यांना आवश्यकता भासली नाहीं
जन्मदात्याला शोधीत
रस्त्यावरून वणवणणाऱ्या
अर्भकांच्या पाठीवरून हात फिरविण्याची...
रांगडे शिपाई
जे हिरोशिमाच्या तिरडीवर
आपुलकीनें निजले
दोन महायुद्धांचं लोणी खात...
रांगडे शिपाई
राठ हातांनीं
ज्यांनीं थवा ओरबाडला
क्रौंचमिथुनाच्या विळख्यांतील
फुलवेड्या बगळ्यांचा...
नाहीं...नाहीं...
आतां आमच्या पायाखालचीं वाळवंटं
वितळलीं आहेत...
त्यांच्या मृगजळांत घुसमटणाऱ्या
आमच्या पावलांच्या खुणाहि
आतां मावळल्या आहेत...
आतां आमच्या या
थकल्याभागल्या पावलांना
वीट आला आहे रस्त्यांचा
चढणीच्या...उतरणीच्या...सपाटीच्या...

आतां आम्हांला असंच पडूं द्या...
असंच पडूं द्या...
मातीच्या हातांनीं
क्रुसाच्या सांवल्या कुरवाळीत...
गारठलेल्या काळोखांत
सूर्यास्ताचीं भुतें गोंजारीत...
शांत...निवांत...एकाकी...
आतां कधींतरी, वाट चुकलेली
एखादी पिंगट चिमणी
ओघळते नक्षत्रांच्या पाकळीवरून
अन् येऊन बसते
आमच्या खांद्यावरील क्रुसांवर
धुक्याचीं थंडगार गाणीं विणीत
तेवढीच...तेवढीच झुळुक
पुरेशी आहे आम्हांला
द्यावयास दिलासा स्मशानशांतीचा...
स्मशानशांति...
नाहीं तिच्यासारखी चिर विश्रांति
एकच आहे ती अशी क्रांति
जिला नसते कधीं मरणाची भ्रांति...
म्हणून सांगतों...म्हणून सांगतों...
नका दाखवूं आम्हांला
या हिरव्या अश्वमेधाचें भर्जरी आमीष...
नका ठेवूं या सांपळ्यांत
या कुबट खोबऱ्याचें खवट विष...
आतां आम्हांला
नाहीं उरला सृजनाचा ध्यास...
आतां आम्हांला

नाहीं राहिला विध्वंसाचा व्यास...
आतां झालों आहोंत आम्हीं
मातीच्या मालकीचे...
बंदे बनलों आहोंत केव्हांच
रक्षेच्या पालखीचे...
आतां कसलें आमंत्रण ?
आतां कसलें निमंत्रण ?
प्रलयाच्या वलयांतून वांचलें आहे
एवढेंच सत्य...
आहे अश्वमेधावर
मातीचेंच नियंत्रण
मातीचेंच नियंत्रण...

खांद्याचें हाड मांडीच्या हाडाला म्हणतें :
आपण आहोंत गुलामांचीं हाडं
परमेश्वराच्या बारशापासूनच
चाटीत आलों आहोंत आपण
आपल्या मालकाच्या पावलांचं कातडं...
रिचविले आहेत तेव्हांपासून
लाचारीचे...अत्याचारांचे लाळघोटे डोंगर...
संभाळली आहे आम्हीं सीझरची तरवार
अलेक्झांडरची सलवार...
धुतला आहे आम्हीं चंगीझखानाचा घोडा
क्लिओपात्रेचा तोडा...
साक्षी ठेवून आंधळया धृतराष्ट्राला
पांडवांचा पट शकुनीनं उधळला
तेव्हां आम्हींच ठेवलीं होतीं तीं
खट्याळ हंसणारीं...
मिस्किल प्यादीं उचलून...

आम्हींच हाणला होता आमच्या हातांनीं
गॉलगोथ्याच्या टेकाडावर तो हातोडा...
अन् सिद्धार्थाला लागले निर्वाणाचे वेध
तेव्हां आम्हींच दिला होता त्याला बांधून
बोधीवृक्षाच्या सांवलीखालीं
डुकराच्या चमचमीत मांसाचा
मसालेदार पागोडा...
आम्हींच मारलें कर्णाला
मातींत चिणून
अन् आम्हींच पाजलं सॉक्रेटिसाला विष
मीरेच्या पेल्यांतून...
हें सारं कशासाठीं ?
आम्हीं केलं कशासाठीं ?
आमच्या चितेवरील म्हणते माती :
केवळ या लाचारीसाठीं...
लाळेंत घोळणाऱ्या
या भाकरीच्या मिंध्या पिठासाठीं...
आतां कसलें आमंत्रण ?
आतां कसलें निमंत्रण ?
लाचारीच्या विचारांतून वांचलें आहे
एवढेंच सत्य :
आहे अश्वमेधावर
गुलामीचेंच नियंत्रण...
गुलामीचेंच नियंत्रण...

कवटयांच्या खिंडारांतून
किंचाळते भुतावळ :
आमचे डोळे जळत होते
आमचे ओठ गळत होते

आमचे शब्द थिजत होते
आमचें मन झिजत होतें
तेव्हां मरणानंच घातलं होतं आमच्यावर
हें मायेचं...मातीचं पांघरूण...
तुम्हांला असं वाटतं का कीं
या आमिषाच्या क्षणीं
करूं आम्हीं मृत्यूशीं विद्रोह
अन् विसरूं त्याचं तें तेजस्वी ऋण ?

हाडांच्या बांसरीमधून
पाऱ्याच्या पावलांनीं भटकणारी
ब्रह्मझुळुक म्हणते
उठा, उठा, शिपायांनो उठा !
गुलामांनो उठा !
मातींतून उठा !
मातींतून उठा !!
बरगडींचीं हाडं...गुढघ्यांचीं हाडं...
मांड्यांचीं हाडं...खांद्यांचीं हाडं...
एकत्र होतात
अन् कवट्यांच्या खिंडारांत उभीं राहून म्हणतात :
नाहीं...नाहीं...
आम्हीं मृत्यूशीं विद्रोह करणार नाहीं...
मरणाचें ऋण विसरणार नाहीं...
हाडांच्या बांसरीमधून
पाऱ्याचे सूर उमटतात :
उठा...उठा...मातींतून उठा...
मातींतून उठा...
पण त्यांचं कुणीच ऐकत नाहीं
हाडांच्या दरींत अश्वमेधाचा घोडा खिंकाळत नाहीं

फक्त...
कवट्यांच्या खिंडारांत
वारा उभा असतो...
अन् मरणाच्या क्षितिजावर
मातीची पहाट उमलत असते...

७.११.५५

## जखमी स्वप्न

मातींतून जातात
सुगंधाचीं नक्षत्रें सळसळत
आणि करते गुलाबी डंख जेव्हां
आषाढचिमणी
वैशाखाच्या वक्षावर
तेव्हां दिसूं लागतें
सप्तस्वरांना
तहानेल्या श्रावणाचें जखमी स्वप्न...
माझ्या मनांतील
पाचूंच्या सूर्योदयांत तडफडणाऱ्या
अहिरभैरवासारखें
तेवत असलेलें...

९.११.५५

# मुखवटा

माझा मुखवटा गळून पडला !

मला वाटलें
घात झाला...

पण खोटी होती
माझी भीति
गळून पडलेल्या मुखवट्याचा ठसा
उमटला होता
जसाच्या तसा
न गळालेल्या माझ्या कातडीवर
आणि घालीत होता
हा शाश्वत, नटखट, नवा मुखवटा
एक फसवी फुंकर
माझ्या दुखऱ्या, बुजऱ्या आत्म्यावर !

३०.११.५५

# फूल

माझ्या रात्रीच्या झाडावर
घुमणारा संगमरवरी शकुनपक्षी
चोंच खुपसून
पश्चिमेच्या शिसवी डोहांत
पेंगत आहे
जडावलेल्या पापण्यांखालीं...
उगवूं लागल्या आहेत
त्याच्या बुंध्याशीं
गोठलेल्या स्फटिकाच्या
बेशुद्ध सांवल्या...
आणि होतो आहे
पाचूंच्या राखेंतून
अनोळखी सूर्योदय
माझ्या रक्तांत...
ज्याच्या प्रकाशांत
कोरीत आहे
तुझ्या अस्तित्वाची चाहूल
चंदनाच्या उंबरठ्यावर
हिरण्मय स्वस्तिकांचें
डेरेदार फूल...

३०.११.५५

# पान

अकस्मात् येतें एक वादळ
आणि अकस्मात् जातें येतें तसेंच
करून आयुष्याची राख...

त्या राखेचें होतें झाड
ज्याच्यावरचीं भुतें उनाड
कण्हत असतात...म्हणत असतात:
ये रे ये रे पावसा ऽ ऽ
तुला देतों पैसा ऽ ऽ ऽ

पुन्हां अकस्मात्
येतो पाऊस...येतें वादळ
जातें झोडपून माझें झाड
ज्याच्यावरचीं भुतें उजाड
जळून होतांना भस्मसात्
कण्हत असतात...म्हणत असतात :
ॐ भवति रक्षां देहि ऽ ऽ
ॐ भवति रक्षां देहि ऽ ऽ.

उन्मळून पडलेल्या माझ्या वैराण झाडावर मात्र
मिणमिणत असतें एक कोंवळें नव्हाळीचें पान
कसल्यातरी विसरलेल्या आठवणीचें
हरण टोळीसारखें हिरवेंगार
गोजिरवाणें...बुजरें...छान

आणि चुकवीत पायाखालची रात्र
वाढत असतों मी गात्रन्‌गात्र
आकाशाच्या दिशेनें
तें झाड खांद्यावर मारून
वाटेवरची राख तुडवीत
त्या पानाच्या आधारानें....

१०.१२.५५

# तप

धुवांधार अंधाराला फुटतात
घुबडाचे अंगारडोळे
आणि दिसूं लागतें
त्यांच्या बुबळांतून मला
माझें मरणारें थडगें
माझ्याच वीर्यांत रुजलेल्या भीतीच्या
थंडगार पिंपळाखालीं गळून पडलेलें...
याच थडग्यांत बसून
कुरवाळीत असतों मी काळोखाचे सर्प
ज्यांनीं करावा
प्रकाशाचा डंख
म्हणून बसलों आहें मी केव्हांचा
या पिंपळाखालीं मांडी मोडून
जाणीवेच्या व्याघ्रांबरावर
कातरीत घुबडाचे पंख...

११.१२.५५

# मीरा

मी मीरा...
विषबाधेनें झालें काळी
अतां तरी दिसते का मी
कृष्णाची सांवळी सांवली?
राधेच्या उन्मन नयनांतिल
मंतरलेली मुग्ध भावली काजळकाळी ?...

१.३.५६

# उध्वस्त

उन्मळून पडला आहे आज
या वाटेवर
गोठलेला सांगाडा
चांदण्याच्या उध्वस्त वृक्षाचा
अन् चिरडली गेलेली
त्याच्या अजस्र भाराखालीं
एका बिटुकल्या पांखराची
नितळ सांवली
शोधते आहे
शब्दांचीं हरवलेलीं भुतें
घुबडडोळयांनीं...
पिसें लावून वितळलेल्या अस्तित्वाचीं
मागतो आहे भीक मातीपाशीं
तिच्या पंखावरचा
जखमेचा जास्वंदी कवडसा
उन्मळून पडलेल्या झाडाच्या उध्वस्त मुळांची...
म्हणतो आहे : दे रे दे !
माझ्या घुबडडोळयांवर इंद्रधनुष्य शिंपणारें...
माझें मोरपीस दे

माझ्या वाटेवर
पांढऱ्या दगडापाशीं
मीहि आज असाच बसलों आहें
उन्मळलेला...
लवलवथ्या जिभेनें
दाणे गोंजारीत

जखमेच्या डाळिंबाचे...
असेंच उसकटून पडलें आहे
माझें गाणारें...इवलालें पांखरूं
अन् त्याच्या वासलेल्या गुलाबी चोंचीवर
तरळतो आहे एकटाच
एक चांदण्याचा थेंब
मातीपाशीं भीक मागणारा
गोजिरवाणा...केंविलवाणा...

६.३.५६

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें. स्थळप्रत.
अनुक्रम २१८७१ वि: ३१०५
क्रमांक २३.५.५८ नों: दि: २५।५।५८

# शेला

अंधाराच्या खांद्यावर
लवली होती नक्षत्रांची फांदी
अन् पांदीपांदीतून होते ठिबकत
कुणाचे तरी भारावलेले निःश्वास
जेव्हां माझ्या कबरीवर रुजत होती
मुक्या बोटांनीं वेदना चांचपणारी
तुझी ज्योतिर्मयी सांवली...
अन् जेव्हां आला
आठवणींच्या आकाशांत ओथंबून
आषाढाचा वादळकळा
तेव्हां तिनंच घेतला ओढून
माझ्या कबरीवर
विराट कफनाचा हिरवा शेला
माती झालेल्या चैत्राचं
भरतकाम केलेला...

६.३.५६

REFBK-0009424
REFBK-0009424

## शेला

अंधाराच्या खांद्यावर
लवली होती नक्षत्रांची फांदी
अन् पांदीपांदीतून होते ठिबकत
कुणाचे तरी भारावलेले निःश्वास
जेव्हां माझ्या कबरीवर रुजत होती
मुक्या बोटांनीं वेदना चांचपणारी
तुझी ज्योतिर्मयी सांवली...
अन् जेव्हां आला
आठवणींच्या आकाशांत ओथंबून
आषाढाचा वादळकळा
तेव्हां तिनंच घेतला ओढून
माझ्या कबरीवर
विराट कफनाचा हिरवा शेला
माती झालेल्या चैत्राचं
भरतकाम केलेला...

६.३.५६

REFBK-0009424
REFBK-0009424

## चैत्रव्रत

तुझ्या दर्शनाची ओढ होती
म्हणूनच ना केली
होत्यानव्हत्याची राख
नि बसलों तिच्या ओंजळींत
युगायुगांचा मागोवा घेत
तुझ्या उगवण्याची वाट पहात ?...
पण या आंधळ्या मातींतून
कधीं काळीं... कधीं काळीं
उमटेल तुझी अग्निकळी
असा संभव दिसेना
म्हणूनच घेतलं आहे या क्षणापासून
मी हें चैत्रव्रत
मींच माझी पाकोळी व्हायचं...
झडणाऱ्या पानझडीची पोकळी फोडायचं...
विस्तवाच्या चोंचीनं सूर्योदय प्यायचं...

६.३.५६

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
ग्रं. क्र. ९४२८
शाखा

# ओहोटी

गुल्मोहराच्या गुहेचं दार उघडावं
तशी तू समुद्रांतून वर आलीस
अन् माझ्या पापणीवर आकाश उमललं
चंद्रानें फेडलें फुलांच्या पाकळ्यांआड
तुझें लाटांचें वस्त्र जेव्हां...
पुळणीवरच्या ओल्या अंधारांत मात्र
शोधीत होती एक चांदणी
हरवलेल्या डोलकाठीवरची रानचिमणी
पापणीवर झुकलेल्या आकाशासाठीं झुरणारी,
क्षितिज संपेपर्यंत उडत रहाणारी
        नक्षत्रांच्या रानांत...
पहात होती तुला चेटुक पिऊन
        गुहेच्या दाराआडून
गोऱ्या गुबगुबीत केळीच्या भरल्या खांबासारखी
        उभी असलेली भरतीच्या समुद्रांत

गुल्मोहराला पडला होता चांदण्याचा विळखा
अन् पापणीवर वितळलेल्या आकाशांत
बुडत होती भारलेली चिमणी
तुझें चेटूक डोळ्यांत सांठवीत
        पंखांत गोठवीत

माझ्या पापणीवर झुकला होता चंद्र
        फुलांच्या पाकळ्यांआडून
        येणाऱ्या ओहोटीची वाट पहात

१०.३.५६

मराठा ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत
अनुक्रम २१९८७ ...... दि: ३/०९ ......

## पॉप्युलर प्रकाशन
## कवितासंग्रह

मंगेश पाडगांवकर
**जिप्सी**
**छोरी**

विंदा करंदीकर
**मृद्गंध**

वसंत बापट
**सेतु**

पु. मं. लाड
**मधुपर्क**

शिवाय

**मेघदूत**
अनुवादक : कुसुमाग्रज